
# श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांचे पुण्यस्मरण



**श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कमिटी**

(श्रीशके १९२३- सन् २००२)



# श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांचे पुण्यस्मरण

श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ कमिटी

(श्रीशके १९२३ - सन् २००२)

श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांचे पुण्यस्मरण

❑

प्रकाशन तिथि :
दि. ४ एप्रिल २००२

❑

प्रकाशन स्थळ :
श्रीलक्ष्मीनारायण भवन
नाशिक

❑

मुद्रक :
कुळागर प्रकाशन
मडगांव

❑

प्रकाशक :
श्रीनिवास वा. शे. धेंपे
श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ
पर्तगाळ - काणकोण - गोवा

❑

संकलक व संपादक :
चंद्रकांत शांताराम केणी

❑

(खाजगी वितरणासाठी)

# श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांचें पुण्यस्मरण

फाल्गुन वद्य सप्तमी ही तिथि उगवतांच श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या परंपरेंतील नववे स्वामी पूजनीय श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ यांचे उत्कटतेने स्मरण होते. ठीक तीनशे वर्षांपूर्वी (शके १६२४) या तिथीला त्यांनी दक्षिण गंगा गोदावरीतीरी आपला देह ठेवला. नाशिक हे भारतांतील एक पुरातन तीर्थक्षेत्र. पश्चिम व दक्षिण भारतांतील यात्रेकरूंचे काशीयात्रेच्या मार्गावरील मुक्कामाचे पवित्र ठिकाण. नाशिक तीर्थक्षेत्र गोदावरी या जीवनदायी नदीच्या किनारी वसलेले असून श्रध्दाळू लोक तिला दक्षिण गंगा असेही संबोधतात. अशा तीर्थक्षेत्री श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ वृंदावनस्थ झाले.

नाशिक क्षेत्राचे नांव उच्चारताच सर्वप्रथम आठवते ती दक्षिण गंगा गोदावरी नदी. भारतीय भाविकांच्या दृष्टीने गंगा व गोदा समान पुण्यदायी आहेत. संत व विचारवंत, भक्त व कवी, यानी दोन्ही नद्यांचे महत्व समान उत्साहाने, आदर व भक्तीने गायिलेले वाचायला मिळते. गोदावरीचे महत्त्व प्रभु रामचंद्राच्या वास्तव्याने वाढले आहे. भूमिकन्या सीतेशी विवाहबध्द झाल्यानंतर अयोध्या नरेशाच्या पदाला जरी मुकावे लागले तरी पितृवचनाची परिपूर्ति करण्याच्या समाधानाने पत्नी सीता व बंधु लक्ष्मण यांच्या समवेत ते दंडकारण्यातील पंचवटी परिसरांत आश्रम बांधून, निसर्गरम्य परिसरात प्रेमळ पशूपक्षांच्या सानिध्यांत, लोकमाता गोदावरीच्या तीरावर राहूं लागले. आपल्या जीवनातील अत्यंत मधुर दिवस श्रीरामचंद्रानी नासिक क्षेत्रातच घालविले होते आणि जीवनांतील अत्यंत दारुण आघात पण त्यांना त्याच ठिकाणी सहन करावा लागला होता. आजही नासिक जवळ गोदावरी नदीच्या किनारी पंचवटी व रामायणात उल्लेखित स्थळे पहायला मिळतात.

गोदावरीचे नाव घेतेवेळी कृष्णानदीचेही नांव घ्यावे लागेल. या दोन्ही नद्यानी महाराष्ट्र व आंध्रप्रदेशच्या जमिनी सुजल व सुफळ बनवून पुरुषार्थी प्रजेची उत्तम सेवा केली. ह्या उभय नद्याच्या अखंड प्रवाहीत असलेल्या पात्रांनी तलवारीच्या जोरावर साम्राज्ये घडलेली पाहिली आणि कोसळलेलीहि पाहिली. या साऱ्या इतिहासाची साक्ष केवळ या नद्याच देऊं शकतील. पण केवळ इतिहास नजरेसमोर उभा करून गोदावरी व कृष्णा तटस्थ राहात नाही. भविष्यकाळ घडविण्याची योजना आजच्या लोकशाहीच्या युगांत त्या लेकराना देत असतात. गोदावरीचे दुसरे वैशिष्ट्य असे म्हणजे तिचा प्रवाह उभय काठावर निसर्गाची समृध्द विपुलता फुलवीत असतो. त्र्यंबक पर्वताच्या हृदयांतून फुटलेल्या गोदावरीने आपल्या

अखंड यात्रेत जलाशयाचा संचय वाढविताना किंवा आपला प्रवाहित विस्तार करताना आपली सृष्टीही समृध्द करून टाकली. कृष्णा व गोदावरी नद्यांचा उगम सह्याद्री पर्वताच्या कुशीत झाला आणि त्यानी पश्चिमेकडे धांव घेऊन सागरात विलीन होण्याचा मान झिडकारून आपले अस्तित्व पूर्व सागरांत विसर्जित करण्याचा पर्याय पत्करला. यामुळें महाराष्ट्र, हैद्राबाद आणि कर्नाटकांतील प्रदेशातील लोकजीवन उन्नत झाले.

त्र्यंबक पर्वत हें गोदावरीचे उगमस्थान. त्र्यंबक गांवापासून पर्वताची चढण सुरू होते आणि ती गोदामैयाच्या मूर्तीच्या चरणापर्यंत भाविकाना घेऊन जाते. येथूनही पुढे जाऊ पहाणाऱ्या भक्तगणाना ब्रह्मगिरीला जायचे असेल तर त्याना बिकट वाट चालावी लागते.

गोदावरीचा उगम जरी निर्जन अशा पहाडात झालेला असला तरी तिच्या इतिहासाचा मुख्य भाग मर्यादा पुरुषोत्तम प्रभु रामचंद्र, सहनशीलता व विषाद यांच्या सहयोगाचे प्रतीक बनलेल्या सीतामाई आणि श्रीराम आज्ञांकित लक्ष्मण यांच्या जीवनांशी निगडीत आहे. हंसत मुखाने राजसिंहासनाकडे पाठ फिरविलेल्या प्रभु रामचंद्राला गोदावरी किनाऱ्यावर बंधु व पत्नीच्या सहवासांत, निसर्गाच्या नयनरम्य परिसरांत जीवनांतील आनंद उपभोगतां आला आणि त्यांच्या जीवनांतील विषाद पर्वाचा आरंभही याच ठिकाणी झाला. सीता - हरणाच्या प्रसंगाने श्रीरामचंद्राचे हृदय विदीर्ण झाल्यास आश्चर्य नाही.

राम व सीता यांचा नंतर पूर्ववत् संयोग झाला खरा पण आजही नासिक पंचवटी परिसरांत सीतावियोगाने बनलेले गंभीर वातावरण सीतेचे स्मरण करीत असावे असा आभास निर्माण करीत आहे. समर्थ रामदास हे श्रेष्ठ राम भक्त. त्यांनी पंचवटी क्षेत्रांत श्री हनुमान् मंदिर उभारले आहे. या क्षेत्रात हनुमान् असता तर सीताहरणाचा दुर्धर प्रसंग ओढवला नसता असे ते प्रतिपादीत असते.

रामकथेचा करुण रस द्वापारयुगापासून आजच्या कलियुगापर्यंत अखंड प्रवाहीत राहिला आहे. गोदावरीला ज्या प्रमाणे दक्षिण गंगा म्हणतात त्याचप्रमाणे तिच्या काठावरील प्रतिष्ठान (पैठण) नगरीला दक्षिण काशी असे संबोधले जाते. एकेकाळी येथील दशग्रंथी ब्राह्मणाचा फार मोठा दबदबा होता. सम्राटांच्या ताम्रपटापेक्षाही या ब्राह्मणांची व्यवस्थापत्रे अधिक महत्वाची मानली जात.

## गोदामातेचे महात्म्य

गोदामैयाच्या काठीं शूरवीर जन्माला आले. थोर तत्वचिंतक तिच्या सान्निध्यांत जन्माला आले. संत आणि देवभक्त यांच्या मनोवृत्तीची जडणघडण येथे घडली. म्हणूनच नित्य स्मरणीय सप्तनद्यांपैकी ही एक पवित्र नदी बनू शकली.

भारतीय सांस्कृतिक परंपरेमध्ये नद्याचे स्थान अद्वितीय आहे. भारताच्या लोकहृदयांत सप्त नद्याचे महत्व व महात्म्य असाधारण आहे.

**गंगे! च यमुने! चैव गोदावरि! सरस्वति!**
**नर्मदे! सिंधु ! कावेरि! जलेऽस्मिन् सन्निधिं कुरु।।**

अशा पवित्र क्षेत्रांत नासिक हे नांव उच्चारतांच ज्याप्रमाणे गोदावरीचे स्मरण होते त्याचप्रमाणे परिक्रमाहि आपसूक घडली. आणि मठाच्या परंपरेतील नववे यतिवर्य श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ यांचे स्मरण उत्कटतेने झाले. कारण त्यांनी या पवित्र ठिकाणी शके १६२४ मध्यें वृन्दावन प्रवेश केला होता. पूज्य श्रीविद्याधिराजतीर्थांनी शके १९२२ मधील चातुर्मास व्रताचरणासाठी नाशिक क्षेत्राची निवड त्याचसाठी केली होती.

चातुर्मास व्रताचरण करण्याचा संकल्प श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाधीश प.पू. श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजीनी केला आणि त्यानिमित्त मठानुयायी वर्गाला या तीर्थस्थानाचे दर्शन घडून ते पावन झाले.

श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ हे आठवे यतिवर्य श्रीरघुचंद्रतीर्थ यांचे शिष्य. श्रीरघुचंद्रतीर्थ हे महत्वाकांक्षी, विद्वान् व तपस्वी होते. समाजाच्या पुनर्वसनासाठी एक भव्य दिव्य स्वप्न त्यानी पाहिले आणि इतस्ततः विखुरलेल्या सारस्वत समाजाला संघटित व सशक्त बनविण्याची एक योजना आंखली. ते पीठावर येण्यापूर्वीच मठाचे मुख्यालय पर्तगाळ येथे हलविण्यात आले होते आणि पर्तगाळ हे कीर्तिवंत स्थान बनू लागले होते. पर्तगाळ येथे साजरा होणारा रामजन्मोत्सव हा पश्चिम भारतातील अत्यंत महत्वपूर्ण उत्सव म्हणून मान्यता पावला होता. त्यांतही नारायणभूताला आपल्या मंत्रसामर्थ्याने नारळांत बंदिस्त करून पर्तगाळ येथेच स्तंभित करण्याचा चमत्कार श्रीदिग्विजय रामचंद्रतीर्थांनी केल्याने लोकमानसांत त्यांच्या गुरुबद्दलचा आदरभाव वृध्दिंगत झाला होता.

आपल्या गुरूंच्या योग्यतेची श्रीरघुचंद्रतीर्थाना पूर्ण कल्पना होती. गुरुपीठावर आरुढ झाल्यानंतर आपणही कांहीतरी भव्यदिव्य करावे असा विचार त्यांच्या मनात यायचा. या विशाल भारत देशांत अनेक तीर्थस्थाने आहेत. कोंकणच्या महासप्तमांत देखील अनेक सांस्कृतिक, सामाजिक, धार्मिक दृष्ट्या महत्वाची अशी स्थळें आहेत. श्रीमध्वाचार्यांनी उडपी क्षेत्रांत अष्टमठ स्थापन केले. त्याच धर्तीवर आपल्या संप्रदायाचे आठ मठ उभारण्याची एक संकल्पना श्रीदिग्विजय रामचंद्रतीर्थांच्या मनात घर करून राहिली. हे महत्‌कार्य पूर्णत्वास नेण्याच्या भावनेने ते शिष्यांची निवड करून त्यांना दीक्षा देण्याच्या कामात मग्न झाले. परंतु श्री रामदेवाला ही कल्पना मंजूर नसावी. एकदा शिष्य करण्यासाठी बटूची निवड करतांच कोवळ्या वयाच्या ब्रह्मचाऱ्याला देहमुक्ति घडली. या विलक्षण प्रकाराने श्रीस्वामीजी अंतर्मुख झाले. मग दैवी आदेश मिळाला : 'श्रीमध्वाचार्यांचे अनुकरण करूं नये. ज्या पीठावर आपण अधिष्ठीत आहात त्या पीठाचा गौरव वाढविण्यातच समाजाचे हित आहे.'

दैवी आदेश श्रीस्वामीनी शिरोधार्य मानला. पण एक पेंच उद्‌भवल्याशिवाय राहिला

नाही. तीन तरुण सुशिक्षित बटूंना गुरुवर्यानी संन्यास दीक्षा दिलेली होती. पैकी आपला उत्तराधिकारी कोणास नेमावे असा प्रश्न श्रीरघुचंद्रतीर्थांना पडला. एका शिष्याचे नाव होतें श्रीसंयमिंद्रतीर्थ. त्यानी गुरुच्या संमतीने मठ सोडला व ते विद्याभ्यासासाठी काशीला गेले. दुसरे शिष्य श्रीव्यासतीर्थ. त्यानी स्वेच्छेने उत्तराधिकारावर पाणी सोडून मठातच देवसेवेस वाहून घेतले. तेथेच त्याचे अवसान झाले. शिष्याश्रमात निर्वाण प्राप्त झालेले मठ परंपरेतील ते पहिले स्वामी. (दुसरे श्रीइंदिराकांततीर्थ यांचे शिष्य श्रीनरहरितीर्थ. या दोन्ही शिष्यस्वामीजींची वृंदावने पर्तगाळ मठामध्ये आहेत.) त्यामुळे श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ यांच्या पट्टाभिषेकाला कोणताच अडथळा आला नाही.

अधिकृतपणे श्रीगुरुपीठारोहण येण्यापूर्वीच श्रीमठाचा कारभार सांभाळण्याची जबाबदारी श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांवर येऊन पडली होती. गुरुवर्य श्रीरघुचंद्रतीर्थ जेवढा अल्पकाळ पीठावर राहिले त्यांतील अधिकांश दिवस त्यांनी तीर्थयात्रा करण्यांत व्यतीत केला. श्रीमठाचा कारभार त्यांनीच प्रिय शिष्य श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांकडे सुपूर्द केला होता. शके १६०४ मधील ही गोष्ट. २ जाने. १६८३ मंगळवार पौष १५मा या दिवशी होनावर येथे श्रीरघुचंद्रतीर्थ वृन्दावनस्थ झाल्यानंतर अधिकृतपणे श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ पीठावर आले. वीस वर्षे त्यांची कारकीर्द राहिली. श्रीशके १६२४ (२७.२.१७०३) रोजी फाल्गुन वद्य सप्तमीला शनिवार रोजी त्यांची इहलोकाची यात्रा संपली.

## तीर्थाटनें

पीठावर येतांच श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ यानी आपली आध्यात्मिक साधना चालू ठेवतानाच मठाला सुबत्ता व दृढता आणण्यासाठी अनेक योजना आंखल्या. या स्वामीजीचा नांवलौकिक इतका होता की छत्रपती संभाजी महाराजानी आपल्या राज्यांत येण्यासाठी दोनदां विनंती पत्रे पाठविली होती. एकदां तर स्वामीजीबद्दल आदर व्यक्त करण्यासाठी छत्रपती संभाजीनी रामनवमीचा उत्सव वैभवाने साजरा व्हावा अशी भावना व्यक्त करून विशेष अनुदान दिल्याचा उल्लेख सांपडतो. मठाला समृध्दि प्राप्त होताच श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांनी शिष्याचा स्वीकार करून त्यांना श्रीलक्ष्मीकांततीर्थ असे नांव दिले आणि त्यांच्या हाती मठाचा कारभार सोपवून स्वतः तीर्थयात्रेस निघाले. धनुष्यकोडी, रामेश्वर, तिरुपती आणि दक्षिणेकडील पुण्यक्षेत्रे पहिल्या टप्प्यांतील समाविष्ट केली. नंतर ते वेणुपुरात आले असता केळदी संस्थानच्या महाराणीनी ब्राह्मणाकरवी त्यांची पाद्यपूजा करवली आणि श्वेतछत्र, चामरे, दीपिका, शंख, शिबिका आदि वस्तू देऊन त्यांचा बहुमान केला. तेथून बसरूर भटकळ मार्गे ते गोकर्ण क्षेत्रांत दाखल झाले.

श्रीगोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठाच्या कक्षेतील मठवास्तूसाठी अथवा देवमंदिरासाठी वापरण्यांत आलेल्या प्रत्येक विटेमध्ये एक कथा व व्यथा दडलेली आहे. ५२७ वर्षांच्या

प्रदीर्घ इतिहासांत या मठाने अनेक स्थित्यंतर पाहिले. पण कसोटीच्या प्रत्येक प्रसंगी मठाधीशांच्या पुण्याईने मठाच्या इभ्रतीला व प्रतिष्ठेला किंवा समाजाचा अभ्युदय व श्रध्दा यांना यत्किंचितहि धक्का लागला नाही. म्हणूनच इतस्ततः विखुरलेला मठानुयायी वर्ग मोठ्या भक्तीने व श्रध्देने श्रीमठाशी आकृष्ट होत असून श्रीगुरुंच्या कृपाशिर्वादाने आपले जीवन अधिक सुकर, अधिक उदात्त व अधिक अर्थपूर्ण होत असल्याचा अनुभव घेत आहे.

## वारणासींतील आगमन

सुप्रसिध्द विश्वनाथ देवालय आणि वारणासी महाक्षेत्रातील गंगातिरी पंचगंगा घाटावर असलेले पुरातन बिंदुमाधव मंदिर इ.स. १६६९ मध्ये दिल्लीचा बादशहा औरंगजेबने जमीनदोस्त केले याची खंत व चीड त्या परिसरातील लोकांमध्ये बरीच वर्षे धुमसत होती. अशा प्रक्षुब्ध वातावरणांत श्रीगोकर्ण मठ परंपरेतील आठवे गुरुवर्य श्री रघुचंद्रतीर्थ यांचे दुसरे शिष्य श्रीव्यासतीर्थ वारणासी येथील पंचगंगा घाटावरील स्वमठाच्या वास्तूंत श्रीलक्ष्मीनारायण मंदिरात शास्त्राध्ययनकरितां वास्तव्य करून राहिले होते.

म्लेंछ लोकांकडून धर्मछळाने मोडण्यात आलेल्या श्रीबिंदुमाधव व श्रीविश्वनाथ देवालयांचे पुनर्निमाण कार्य जवळच्या निवेशनांत झाले. जमीनदोस्त झालेल्या बिंदुमाधव देवस्थानच्या समोर असलेल्या आपल्या मठाकडे दुष्मनाचा मोर्चा वळण्याची शक्यता असल्याची भीती श्रीव्यासतीर्थांना अस्वस्थ करीत होती. पर्तगाळ मठाच्या गुरुपीठावर असलेले आपले गुरु श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ स्वामी याना आपली आशंका कळवून ते एका पत्रांत लिहितात : "आपण स्वतः वारणासींत पंचगंगा घाटावरील मठात वास्तव्यास येऊन ह्या मठाचे मालक स्वतः आम्ही आहोत, असे लोकमानसांत बिंबवले तरच मठ ताब्यांत राहूं शकेल. पर्तगाळ येथे बसून ह्या मठाची मालकी सांभाळण्याचा मनोदय आपण केलेला असेल तर हा मठ हातचा गमावून बसावा लागेल. आम्ही (व्यासतीर्थ) येथे आहोंत म्हणून त्याचे रक्षण आम्ही करूं शकूं अशी अपेक्षा करूं नये. स्वतःची मालकी आपण वारणासीला येऊन दाखविली तरच श्रीसंस्थानच्या मालकीत ही मठ वास्तु राहू शकेल. न पेक्षा येथल्या मुस्लीम लोकांच्या धुमाकुळांत हा मठ आमच्या हातून निसटेल."

प्रिय शिष्याने मोजक्या शब्दात वारणासी येथील गंभीर परिस्थितीची कल्पना दिल्यानंतर गुरुवर्यांनी पुढची तयारीं केली. त्यांनी वारणासीला जाऊन स्वीय मठांत वास्तव्य करण्याचा संकल्प केला. भविष्यकाळाची त्यांना कल्पना असावी. त्यासाठीस असेल कदाचित पण पर्तगाळीहून प्रयाण घेण्यापूर्वी सर्व संभाव्य परिस्थितीला तोंड देण्याची तयारी असावी असा विचार करून श्रीलक्ष्मीकांततीर्थ हे आपले उत्तराधिकारी असतील याची आज्ञारायसाद्वारे मठानुयायी शिष्यवर्गाला सूचना देऊन ठेवली आणि मगच वारणासीकडे प्रस्थान केले.

श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ यानी सतत आठ वर्षे वारणासी मठांत वास्तव्य करून गंगा तटापासून ३३ फूट उंच, ३६ फूट रुंद, ६६ फूट लांब असा मजबूत काळ्या पाषाणाच्या फरशा व खांब वापरून शोभिवंत व बळकट पायावर तीन मजली वास्तू उभी केली. या वास्तूला ३२ दरवाजे व ६४ खिडक्या ठेवल्या. तीन मजल्यापैकी पहिला मजला (तळमजला) हा पूर्णपणे शिलामय बांधला. वरचे दोन मजले बांधण्यासाठी मजबूत विटा व उत्तम प्रतीचा चुना वापरला. या भक्कम वास्तूच्या बांधकामाचा तपशील मठाच्या दप्तरांत वाचायला मिळतो.

## नाशिक येथें मुक्ति

पर्तगाळ येथील श्रीरामनवमी उत्सवाला पोहोचावे ह्या मनोदयाने ते परतीच्या प्रयाणला लागले. वारणासीवरून दर दिवशी ठराविक अंतरापर्यंत मार्गाक्रमण करीत ते फाल्गुन कृष्णपक्षांत नाशिक येथे पोंचले. तेथे त्यांनी वास्तव्यहि केले. नासिक क्षेत्राचे साधुसंतांना व संन्यासी नि भाविकांना अत्यंत आकर्षण वाटण्याचे एक कारण म्हणजे गोदावरी नदी होय. गोदामाता ही गंगामैय्याची ज्येष्ठ भगिनी मानली जाते. काशीयात्रा करून गंगेच्या पावन जलाशयाने पापमुक्त व शापमुक्त होऊन अंतर्बाह्य शुचिर्भूत झाल्यानंतर मनांतील किल्मिषे गळून पडतात व शंका-आशंकांचें निवारण होऊन आपल्या ध्येयप्राप्तीच्या मार्गाने नव्या दमाने पावले उचलण्याची प्रेरणा मिळत असते. परंतु दक्षिणेकडील भाविकांचे यात्रेचे कर्तव्य तेवढ्याने संपत नाही. वाटेंत गंगामैय्याची बहीण त्यांची प्रतिक्षा करीत असते. काशीहून संतुष्ट मनाने त्यानी यावे. सोबत आणलेल्या गंगाजलाचा एक घट आपल्या तीर्थांत विलीन करावा अशी तिची मनोमन भावना असते. या बाबतींत कसूर राहिल्यास गोदामाता कोपते व आपली उपेक्षा केलेल्या यात्रेकरूला गंगास्नानाचे फळ प्राप्त होऊं नये असा शाप देते. अर्थात ही वदंति असली तरी भाविकांच्या दृष्टीने तिचे महत्व कमी नाही. याच कारणासाठी श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांनी पर्तगाळीला परतण्याची घाई असतांनाहि नासिक क्षेत्रांत मुक्काम केला. ह्या वास्तव्यांत त्यांना वारणासीवरून नाशिकपर्यंतच्या पदयात्रेचा थकवा जाणवला. अखंड पदयात्रेमुळे आणि वार्धक्याने थकलेले शरीर पर्तगाळी पर्यंत पोहोचू शकले नाही. नाशिक वास्तव्यांतच फाल्गुन कृष्ण सप्तमीला ते वृन्दावनस्थ झाले.

गुरुवर्यांच्या महानिर्वाणाची वार्ता येतांच नेमलेले उत्तराधिकारी श्रीलक्ष्मीकांततीर्थ यांनी श्रीगुरुपीठावर आरूढ होण्यापूर्वीच त्यांनी गुरुंच्या वृंदावनाचें बांधकाम करण्याचा आदेश दिला व तेथे पूजाअर्चा करण्याची तरतूद केली. तेथील विनियोगासाठी नियमितपणे पैसे पाठविण्याचीहि तरतूद केली.

मध्यंतरी त्या वृंदावनाची पूजाअर्चा करणाऱ्या अर्चकाकडील पर्तगाळ मठाचा संपर्क तुटला व तो पुन्हा प्रस्थापित करण्याचा प्रयत्न अपेशी ठरला. परिणामी त्या वृंदावनाचे काय

झाले ते समजण्यास मार्ग राहिला नाही.

गुरुवर्य श्रीद्वारकानाथतीर्थ यांनी ते वृंदावन शोधून काढण्याचे अनेकदा प्रयत्न केले. पर्तगाळ मठातील वृंदावनाची काही वैशिष्ट्ये असतात. तसे एक वृंदावन नासिक येथे गोदातीरी दिसले. पण एक बैरागी ते आपल्या मालकीचे मंदिर असल्याचा दावा करून बसला आहे.

## श्रीविद्याधिराज पर्व

श्रीसंस्थान परंपरेंतील तेविसावे मठाधीश परमपूज्य श्रीविद्याधिजराजतीर्थ श्रीपाद वडेर स्वामीजी हे श्रीशालिवाहन शके १८९५ चैत्र शुक्ल द्वितिया, दि. ५ एप्रिल १९७३ रोजी श्रीगुरुपीठावर आल्यानंतर परंपरेतील इतर स्वामीजींनी केलेले संकल्प पूर्ण करणे व त्याच्या पावलावर पाऊल ठेवून त्यांनी केलेल्या सर्व यात्रा, आचरलेली सर्व तपे व यज्ञयाग आपणहि करावेत हा संकल्प केला. त्यासाठी श्री मठाच्या दप्तरांतील उपलब्ध कागदपत्रांची चिकित्सापूर्वक पाहणी केली व एक दीर्घकालीन कालबध्द कार्यक्रम आंखला. या कार्यक्रमामध्ये जुन्या मठवास्तूंची डागडुजी व विस्तार करणे आणि त्या त्या ठिकाणी स्थायिक झालेल्या मठानुयायी वर्गाला मठाशी संलग्न करून मठ हें समाज मीलनाचें, स्नेहवृध्दीचे सांस्कृतिक केंद्र व्हावे असा उद्देश ठेवला.

ज्या ज्या ठिकाणी मठवास्तूमध्ये देवप्रतिमेची विधिवत् प्रतिष्ठा झालेली असेल तेथे नित्य पूजाअर्चा व इतर धार्मिक कार्ये अव्याहत चालू राहावीत अशी तजवीज केली. बदलत्या काळानुरूप जेथे जेथे सारस्वत समाजाचे व्यवसाय क्षेत्र विस्तारले त्या ठिकाणी जाऊन समाजाची धार्मिक व सांस्कृतिक गरज भागविण्यासाठी नव्या मठवास्तू उभारल्या. खुद्द पर्तगाळ मठवास्तूची एक प्रकारे पुनर्बांधणी करून श्रीरामदेवाच्या गळ्यांत सुबक वास्तुरूपी पुष्पहार अर्पण केला. श्रीमठ स्थापनेचे पंचशताब्दि व सपाद पंचशताब्दि महोत्सव साजरे करून इतस्ततः विखुरलेल्या मठानुयायी वर्गाचे आपसांत सख्य वाढेल असे वातावरण निर्माण केले. सारस्वत समाजाच्या इतर मठाधीशांशी स्नेहसंपर्क ठेवून आणि त्या मठाच्या अनुयायांशी देखील आत्मीयतेचे संबंध ठेवून समाज संघटनांचे कार्य चालू ठेवले. समाजांतील विविध वर्गाच्या यातना-वेदना, आपसांतील कलह-तंटे मिटविण्याच्या कार्याला अग्रक्रम दिला. समाजाच्या विविध वर्गांतील कुलदैवतांची व इतर दैवतांची जेथे जेथे मंदिरे होती त्यांचा जीर्णोध्दार, विस्तार करून अनेक ठिकाणी जरुरीनुसार कल्याणमंडप आदि सुविधा निर्माण करण्यात स्थानिक देवस्थानच्या कमिट्यांना प्रवृत्त केले. त्याचप्रमाणे देवमंदिरांत धर्मशास्त्रांत नमूद केलेल्या यज्ञयागादि अनुष्ठाने घडवून आणलीं. स्वतःच्या नाजूक प्रकृतीकडे दुर्लक्ष करून आणि थोडासा देहक्लेश पत्करून संन्याशांसाठी प्रशस्त मानल्या जाणाऱ्या बहुतेक सर्व तीर्थयात्रा यशस्वीपणे पूर्ण केल्या. अशा यात्रांमध्ये गंडकी परिसरांतील

श्रीशालिग्राम क्षेत्रातील श्रीदामोदर कुंडाची खडतर, दुर्धर व कष्टसाध्य यात्रा पायी चालून पूर्ण केली. श्रीदामोदर कुंड हे भूतलावरील भगवान् विष्णूच्या अष्टमहाक्षेत्रांपैकी सर्वोच्च क्षेत्र मानले जाते. अलीकडेच गोमुखापासून सागर संगमापर्यंत श्रीगंगेची परिक्रमा करून तीर्थयात्रांचे आपले सारे संकल्प पूर्ण केले. त्याशिवाय स्वाध्यायाकडे दुर्लक्ष होणार नाही याची त्यांनी कटाक्षाने दक्षता घेतली आणि श्रीमन्न्यायसुधा पाठाची यशस्वी पूर्तता केली.

याच संकल्पाचा एक भाग म्हणून श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजींनी श्रीशके १९२२ संवत्सरांत श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ यांचे स्मरण करून नाशिक क्षेत्री चातुर्मास व्रताचरण केले. प्रभु रामचंद्रांच्या चरण स्पर्शाने पावन झालेल्या त्या तीर्थक्षेत्राचे श्रीरामाच्या भक्तांना आकर्षण असतेच. पण या तीर्थस्थानी मठाच्या इतिहासांत महत्वाची भूमिका बजावलेले नववे स्वामी श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ यांचे चिरस्थायी स्मारक उभारण्याचा त्यांनी संकल्प केला. श्रीमठाच्या मालकीची एक जागा या तीर्थक्षेत्री होती याची नोंद मठाच्या दप्तरांत त्यांनी पाहिली होती. पण ती जागा नेमकी कुठे आहे याची कल्पना नव्हती. बराच शोध व संशोधन केल्यानंतर असे समजून आले की, मूळ जागा रस्ता व पूल बांधण्यासाठी राज्य सरकारने स्वतःकडे घेतली होती आणि त्यासाठी त्या जागेची किंमत चुकविण्याची तयारी दाखवली होती. आर्थिक मोबदला घेण्यास तत्कालीन मठाधीशांनी नकार दिला आणि सरकारने पर्यायी जागा द्यावी अशी मागणी केल्याची नोंदहि सरकारी दप्तरांत सांपडली. त्यानंतर काम बरेच सुलभ झाले. चातुर्मास व्रत मुक्कामाच्या काळांत मठानुयायी वर्गाच्या मदतीने श्रीविद्याधिराजतीर्थांनी पर्यायी जागा मिळविली. नाशिक-मुंबई महामार्गावरील या जागेत चातुर्मास समाप्तीनंतर नाशिकहून परतताना श्रीस्वामीजींनी नव्या मठाचा शिलान्यास केला आणि आज ४ एप्रिल २००२ रोजी त्या वास्तूचे त्यांच्या पवित्र हस्ते उद्घाटन होत आहे ही आनंद व अभिमानाची गोष्ट आहे.

### भवनाची पार्श्वभूमि

एखाद्या शुभकार्याला मुहूर्ताची जोड मिळावी लागते, ही मान्यता अगदीच निरर्थक म्हणता येणार नाही. निदान श्रीमठ परंपरेतील नववे गुरुवर्य श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ यांच्या बाबतींत असे घडलें हे आपण आज पाहात आहोत. नासिक येथे गोदावरी तीर्थावर रामक्षेत्रांत त्यांनी देह ठेवला या गोष्टीला आज (४ एप्रिल २००२) तीन शतके होत आहेत. योगायोगाने घडून आलेला हा एक मंगलदायी संयोग आहे. श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांचें स्मरण प्रत्येक यात्रेच्यावेळीं, विशेषतः पंचगंगा घाटावरील स्वीय मठांत वास्तव्य घडले त्या त्या वेळी परंपरेतील तेविसावे विद्यमान मठाधीश परमपूज्य श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजींना उत्कटपणे व्हायचे. नाशिक क्षेत्रांत त्यांच्या स्मृत्यर्थ एखादे उपासना मंदिर उभारण्याची कल्पना त्यांचे प्रिय गुरुवर्य वृंदावनस्थ श्रीद्वारकानाथतीर्थ स्वामीजी किती उत्कटतेने राबवीत होते याची जाणीवहि पूज्य श्रीविद्याधिराजतीर्थ स्वामीजींना मनोमन होत होती. पण संकल्प

सिध्दीला जाण्यासाठी भगवंताचे अधिष्ठान असावे लागते. ते योगायोगानेच घडून आले.

श्रीशके १९२२ या संवत्सरांतील चातुर्मास व्रताचरण नासिक क्षेत्रांत करण्याचे ठरवले ते देखील एखाद्या दैवी आदेशानेच होय. कोणतीहि पूर्व तयारी नसताना केवळ पूर्वसूचना देऊन श्रीस्वामीजी नासिक क्षेत्रांत दाखल झाले ते मुख्यत्वें करून दोन कारणांसाठी. श्रीपर्तगाळ येथील मुख्यालयांत सपाद पंचशताब्दि महोत्सव वैभवाने साजरा झाल्यानंतर प्रभु रामचंद्राच्या वास्तव्याने व पदस्पर्शाने पुनीत झालेल्या क्षेत्रांत काही काळ वास्तव्य करावे असा त्यांनी संकल्प केला आणि शरयू नदीच्या तिरीं त्या संवत्सरांतील चातुर्मास साजरा करण्याची योजना आंखली जात असताना अचानक परमपूज्य श्रीलक्ष्मीनारायणतीर्थांचे स्मरण झाले. नासिक क्षेत्राचें महत्व व महात्म्य आणि गोदामातेचे वात्सल्य यांची त्यांना कल्पना होतीच. पण आपल्या परंपरेतील एका कर्तृत्ववान तपस्वी स्वामीजींच्या वृंदावनाच्या सान्निध्यांत चातुर्मास व्रताचरण केल्यास अनायासे श्रीमठ परंपरेची एक परिक्रमा घडेल आणि श्रीरामदेवाची इच्छा असेल तर नासिक क्षेत्रांत श्रीमठवास्तूची उभारणी करून पूर्वसुरींचे स्वप्नहि साकार होऊ शकेल.

आणि तसेच घडलें. श्रीमठाची पुरातन जागा शहर विस्तारासाठी सरकारने ताब्यांत घेतली होती आणि मठाला पर्यायी जागा चेतन नगर परिसरांत देऊं केली होती. पण तो सरकारी निर्णय कार्यवाहींत आणण्यासाठी पाठपुराव्याची आवश्यकता होती, सोपस्कार पूर्ण करायचे राहून गेले होते. नासिक येथील वास्तव्याचा फायदा घेऊन मठानुयायी वर्गाची मदत घेऊन श्रीस्वामीजींनी सर्व सोपस्कार पूर्ण करवून घेतले आणि नासिक-मुंबई महामार्गावरील विस्तृत जागेत चातुर्मास समाप्ती दिवशी नव्या वास्तूची कोनशिला बसवूनच परमपूज्य श्रीविद्याधिराजतीर्थ मुंबईला परतले होते. आज दीड वर्षांनी पूज्य श्रीलक्ष्मीनारायणतीर्थ स्वामीजींच्या पुण्यतिथीला नूतन वास्तूचे उद्घाटन स्वहस्ते करण्याचे भाग्य श्रीस्वामीजींना लाभत आहे ही धन्यतेची गोष्ट होय.

## भवनाचें स्वरुप

नासिक हे पुरातन क्षेत्र असले तरी त्याचे प्राचीनत्व व पावित्र्य कायम ठेवून नव्या युगांत ती अद्यावत उद्योगनगरी बनविण्याची प्रक्रिया जोरात सुरू झालेली आहे. भारताच्या औद्योगिक नकाशांत नासिकला आज ठळक स्थान प्राप्त झालेले आहे. त्या शहरांत आज सुमारे अडीचशे सारस्वत कुटुंबें राहात असून शहराच्या औद्योगिक विकासाबरोबरच तेथे स्थायिक होणार असलेल्या सारस्वत कुटुंबांची संख्या झपाट्याने वाढू शकेल. समाजांतील ह्या घटकांना त्यांचा इतिहास, त्यांची परंपरा, त्यांचे संस्कार व संस्कृति याची कल्पना राहावी आणि कुलदैवत व गुरूपीठांकडील त्यांचे संबंध अतूट राहावे. त्याच बरोबर परकी मुलखांत ज्ञातिबांधवांच्या संपर्कांत राहण्याची त्यांना संधि मिळून समाजात स्नेह-सलोखा व

सहकार्याची भावना वृध्दिंगत व्हावी हा श्रीलक्ष्मीनारायण भवन उभारण्यामागील मुख्य हेतु आहे.

१५ सप्टेंबर २००० रोजी शिलान्यास झालेली ही वास्तू अडीच हजार चौरस मीटर क्षेत्रांत उभारण्यांत आलेली असून सरकारने संपादित केलेल्या जुन्या जागेच्या बदली एक प्रकारे मठाने त्या जमिनीची किंमत चुकती केली आहे. मठवास्तूची जागा मुंबई-आग्रा राष्ट्रीय हमरस्त्यावर नासिक शहरांत प्रवेश करतांच पांडव गल्लीच्या नाक्याजवळ आहे. शहरांतील मध्यवर्ति बसस्थानकापासून एक किलोमीटर अंतरावर असलेली ही वास्तू नासिक रोड रेल्वेस्थानकापासून दहा किलोमीटर अंतरावर आहे तर श्रीलक्ष्मीनारायण भवनापासून श्रीरामकुंड (पंचवटी) केवळ सहा किलोमीटर अंतरावर आहे.

भवनाच्या वास्तूचे क्षेत्रफळ ६१० चौ.मी. असून तें आरसीसी पध्दतीने बांधण्यात आलेले आहे. वास्तूची उंची पांच मीटर आहे. प्रवेशाजवळ दर्शनी भाग, नंतर दुतर्फा खुले व्हरांडा असलेले सांस्कृतिक सभागृह, जे व्यासपीठ व दुतर्फा खोल्यांनी सुसज्ज आहे. त्याशिवाय व्यासपीठाच्या मागील भागांत अतिरिक्त खोल्या ठेवण्यांत आल्या आहेत. प.पू. स्वामीजींच्या निवासासाठी सर्व सोयींनी परिपूर्ण अशी एक खोली असून देव्हारा व पूजास्थानाची वेगळी व्यवस्था आहे. आच्छादित स्वयंपाकघर व बाजूला खुले स्वयंपाक गृह ठेवलेले असून मोटारगाड्या थांबविण्यासाठी छप्पराने आच्छादित अशी वेगळी जागा ठेवण्यांत आलेली आहे. या वास्तूला जोडून जनित्रकक्ष व तुळसी वृंदावन असून बाजूची मोकळी जागा विशेष प्रसंगी विशाल मंडप उभारण्यास पुरेशी आहे. सभागृहाच्या दुतर्फा असलेले व्हरांडे विस्तृत व रुंद असून आंखलेल्या योजनेमध्ये एक बगीचा तयार करण्याचीहि तरतूद आहे. सर्व प्रकारच्या धार्मिक, सांस्कृतिक, सामाजिक कार्यासाठी हे भवन नासिककरांना उपलब्ध होणार आहे.

o o

## दि. १४ एप्रिल २००२ रोजीं

* प.पू. श्रीविद्याधिराजतीर्थांचा श्रीगुरुपीठारोहण वर्धापनदिन.
* श्रीमठ संस्थापना दिन
* श्रीविद्याधिराज पुरस्कार प्रदान सोहळा

स्थान : श्रीपर्तगाळ मठ, पर्तगाळी - गोवा

# श्री संस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ

## (शाखा - नाशिक)


### सल्लागार समिति

| | | |
|---|---|---|
| १. व्ही. के. पै | - | चेअरमन, श्रीसंस्थान गोकर्ण पर्तगाळी जीवोत्तम मठ, कात्रक रोड, वडाळा, मुंबई |
| २. रामचंद्र रंगप्पा कामत | - | गौरव प्रतिनिधी, हुबळी |
| ३. नागेश के. फोवकार | - | सल्लागार, मुंबई |
| ४. एस्. एस्. भट्ट | - | " " |
| ५. विजेन्द्र एम्. शणै | - | " " |


६. प्रकाश शेटगिरी - वास्तुशिल्प तज्ञ, मुंबई.

### कार्यकारी समिती

| | | |
|---|---|---|
| १. के. सुधाकर कामत | - | (कार्याध्यक्ष) |
| २. जी. जी. गाडेकर | - | (कार्यदर्शी) |
| ३. दिनेश अे. कैलजे | - | (कोषाध्यक्ष) |
| ४. जी. वामन आचार्य | - | (संयुक्त कार्यदर्शी) |
| ५. अनिल रामदास पै | - | (सदस्य) |
| ६. विनायक रामचंद्र भट्ट | - | ( " ) |
| ७. राघवेन्द्र प्रभु | - | ( " ) |
| ८. विठ्ठलदास शणै | - | ( " ) |
| ९. मारुती प्रभु | - | ( " ) |




SECTION - a - a



श्रीलक्ष्मी नारायण भवन (नाशिक)चें एक रेखाटन